जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२१/११/२०२३
## दि.२०/११/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ७५१/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ५३ वर्षे,रा.खोपडेनगर कात्रज,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/११/२०२३ रोजी दुपारी १६/३० वा.पोलीस मदत केद्र बुथ कॉर्नर,कात्रज घाट, भिलारेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मोटार सायकलवरुन कात्रज घाट उतरुन,कात्रजच्या दिशेने येत असताना नमुद ठिकाणी त्यांचे पाठीमागुन मोटार सायकलवरुन आलेल्या दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचे जवळ येवुन,त्यांचे गळ्यातील सोन्याची चेन ७५,०००/- रु किंची जबरी चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. अमोल रसाळ ९७०२९७४०४० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३०६/२०२३,भादविक ३०७,४२७,५०४,५०६,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५, क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | जितेंद्र शिंदे,वय-४० वर्षे,रा.महर्षीनगर,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे तीन अनोळखी साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/११/२०२३ रोजी २०/३० वा.४०/४२,महर्षीनगर, झामरे पॅलेस येथील फिर्यादीचे दुकाना समोर व संत नामदेव शाळा गुलटेकडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे महर्षीनगर,झामरे पॅलेस येथील त्यांचे जनरल स्टोअर दुकानावर असताना, यातील नमुद इसमांनी मोपेड वरुन त्यांचे दुकानात हातात धारदार शस्त्रे घेऊन येऊन,सदर इसमाने त्याचे हातातील धारदार शस्त्र फिर्यादीचे अंगावर उगारुन,तु जर माझे विरुध्द पोलीसात तक्रार केली तर,तुला मारुन टाकीन अशी धमकी देवुन,आरडा-ओरडा करुन, दुकानाचे बाहेर जावुन,दातार मेन्स पार्लर या दुकानाबाहेर रोडवर असलेल्या दुचाकीवर धारदार शस्त्राने वार करून,सदर वाहनाचे नुकसान केले. त्यानंतर संत नामदेव शाळे जवळ जाऊन,त्याठिकाणी उभे असलेल्या नागरीकास शिवीगाळ करुन,त्यांना धमकावुन,तेथील रिक्षाची काच फोडुन परिसरात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, उमेश कारके ९७६७७१८०९९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ४७७/२०२३,भादविक ३९२,३३६,३२३,४२७,५०४,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५, क्रिमीनल अमेंडमेंट ॲक्ट ७ प्रमाणे |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३० वर्षे,रा.वारजे माळवाडी,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे तीन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/११/२०२३ रात्रौ ०१/३० वा.ते ०१/४५ वा.चे दरम्यान यशोदीप चौकाकडुन विठ्ठलनगर कडे जाणा-या सार्वजनीक रोडवर वारजे माळवाडी,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहत्या घरा समोरुन त्यांचे वडिलांना शिवाजीनगर येथुन आणण्यासाठी जात असताना,यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करुन,फिर्यादीस शिवीगाळ करुन,हाताने मारहाण केली. तसेच हातातील धारधार शस्त्राचा धाक दाखवुन त्यांचे खिशातील ४,०००/- रूपये रोख रक्कम जबरी चोरी करून,तेथील वाहनांच्या काचा धारधार शस्त्राने व बांबुने फोडुन सदर वाहनांचे नुकसान केले. तसेच आजुबाजुच्या राहते परीसरातील नागरीकांचे घराच्या खिडकीवर दगडफेक करुन नुकसान करून,सदर परिसरात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ओलेकर ७५०६०७२७११ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ३४३/२०२३,भादविक ३२६,३२३,५०४,५०६,३४,आर्म अँक्ट कलम ४(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३)सह १३५,क्रिमीनल लॉ अमेंडमेट कलम ३ व ७ |
| **फिर्यादी** | विकास बेरे,वय-२५ वर्षे,रा.स.न.२७ मुंजाबा वस्ती,धानोरी,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे इतर दोन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १९/११/२०२३ रोजी रात्री २३/०० वा.बिकानेर स्वीट समोर तसेच नारायण मोझे शाळे समोर,मुंजबा वस्ती,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे चुलत भाऊ भीमा शंकर बेरे,वय-१८ वर्षे हे जेवण झालेनंतर फेरफटका मारुन,गप्पा मारत थांबले असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरुन येवुन फिर्यादी व भीमा बेरे यांना शिवीगाळ व दमदाटी करुन,सदर इसमाने त्याचे हातातील धारधार शस्त्र फिरवुन दहशत निर्माण करुन,फिर्यादी व भीमा बेरे यांना कंबरेच्या पट्टयाने व हातातील जाड कडयाने,लाथा-बुक्यांनी मारहाण केली. तसेच भिमा बेरे याचे डोक्यात हातातील कडे मारुन त्यांना गंभीर जखमी करून,पोलिसांत तक्रार केली तर तुमचे काही खरे नाही,तुम्ही परत मुंजाबा वस्तीत दिसणार देखील नाही अशी धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सत्यवान गेंड ८०८०२८५२९१ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ५६२/२०२३,भादविक ३९२,३५४,३५४(अ),३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२९ वर्षे,रा.वानवडी,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २०/११/२०२३ रोजी रात्रौ ००/१५ वा.राईट फ्लँक रोड,कमांड हॉस्पिटल जवळ, वानवडी,पुणे येथील सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे काम संपवुन त्यांना रिक्षा,कॅब वगैरे काही मिळाली नसल्याने त्यांचे राहते घरी पायी जात असताना,त्यांचे पाठीमागुन आलेल्या नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना धक्का-बुक्की करून,त्यांचा विनयभंग करून,त्यांचे हातातील मोबाईल फोन ३,०००/- रु जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. संतोष गायकवाड ८३०८९३२१०० |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५६७/२०२३,भादविक २७९,३०४(अ),३३७,३३८,४२७,मो.वा.का.कलम १८४, ११९/१७७ |
| **फिर्यादी** | उत्तम शिंदे, पोलीस अंमलदार, सिंहगड रोड पोलीस ठाणे,पुणे शहर |
| **आरोपीत** | शिरीषकुमार कांचन वाढोणकर,वय-४२ वर्षे,रा.सांरग बिल्डींग,नांदेड सिटी,पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २०/११/२०२३ रोजी पहाटे ०२/५४ वा. प्रायेजा सिटी सोसायटीचे गेट समोर कॅनॉल रोड,वडगाव-खुर्द,पुणे येथे सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद इसम शिरीषकुमार वाढोणकर याने त्याचे ताब्यातील मोपेड ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी असलेल्या गतीरोधकावरुन स्वतः पडुन डोक्याला गंभीर दुखापत होवुन,त्यामध्ये गंभीर जखमी होवुन, स्वतःचे मृत्युस व त्याचे मोपेडचे नुकसानीस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. श्रीधर खडके ९८२३९९१६८२ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ७७५/२०२३,भादविक २२४ |
| **फिर्यादी** | हेमंत पाटील,वय ४३ वर्षे,तुरुंग अधिकारी,(श्रेणी-२),येरवडा खुले जिल्हा कारागृह,पुणे |
| **आरोपीत** | एक शिक्षा बंदीवान (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २०/११/२०२३ रोजी दुपारी १२/०० वा.बॅरेक क्र.४,खुले कारागृह,येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम शिक्षा बंदी क्र.सी/९४९ हा येरवडा खुले जिल्हा कारागृह,पुणे येथे वारजे माळवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.५९/२००८,भादंविक ३०२,३०७,आर्म अँक्ट,४(२५) या कलमा अंतर्गत शिक्षा भोगत असताना,त्यास खुले कारागृह,येरवडा,पुणे येथे कारागृहातील रेशन विभागात काम देण्यात आलेले होते. दिनांक २०/११/२०२३ रोजी त्याची तब्येत ठिक नसल्याने तो कामावर न जाता,बॅरेक क्र.४ मध्ये थांबला असताना,त्याने फिर्यादी यांचे कायदेशीर रखवालीतुन पळुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अशोक काटे ८८०५१७९७७५ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | उत्तमनगर पो स्टे ११८/२०२३,भादविक ३९५,५०६,३४,आर्म ॲक्ट कलम ३(२५),४(२५) सह मपोका ३७(१)१३५,क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ |
| **फिर्यादी** | मनोज मोरे,वय-३३ वर्षे,रा.कोंढवे-धावडे,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील सहा अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/११/२०२३ रोजी २१/२५ वा. आर.आर.वाईन्स शॉप,एनडीए रोड,कोहिनुर चौक,शिवणे, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांपैकी चार इसमांनी फिर्यादी यांचे आर.आर.वाईन्स शॉपचे दुकानात येवुन,दुकानातील अंदाजे ३,०९,०००/- रुपये रोख रक्कम व ३,२००/- रुपये किंचे ब्लेंडर प्राईड कंपनीच्या दोन बाटल्या असा एकुण ३,१२,२००/- रुपये किंमतीचा ऐवज काऊंटर मधुन उचलुन,त्यांचेजवळ असलेल्या काळया रंगाच्या बॅगेत घेवुन,काऊंटरवरुन उडया टाकुन, शिवणेच्या दिशेने दुचाकीवरुन पळुन गेले. सदरवेळी काऊंटरच्या बाहेर असलेल्या दोन इसमांनी त्याचे हातातील तलवार हवेत फिरवुन,तेथे कुणी पुढे आले तर मारुन टाकेन असे बोलुन,धारधार शस्त्रे हवेत फिरवुन,सदर नागरीकां मध्ये दहशत पसरविली आहे. |
| **त.अंमलदार** | वरीष्ठ पोलीस निरीक्षक, किरण बालवडकर ९४२१२६२०७४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**